महाराष्ट्र शासन
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**
महाराष्ट्र राज्य
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१
दू. क्र. ०२०-२६३६२०७१ Website-www.trti.maharashtra.gov.in Email – trti.mah@nic.in

जा.क्र./माहिती तंत्रज्ञान/२०२५-२६/०१/ ४७७ दि: १४/१०/२०२५

# - प्रसिद्धी पत्रक-

**विषय** - सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, महाराष्ट्र राज्यासाठी नव्याने विकसित केलेले e-Tribe Validity (आदि प्रमाण प्रणाली) LIVE करण्याबाबत...

**संदर्भ** - १) महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)अधिनियम २००० व नियम, २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीकरिता प्राप्त होणाऱ्या दाव्याबाबत
२) आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्राप्त पत्र क्रमांक:-बैठक-२०२५/प्र.क्र. ०८/का.१० याप्रमाणे दि.०९/०५/२०२५ रोजीचे पत्र
३) दि.२१/०८/२०२५ रोजीचे प्रसिद्ध पत्रक — जा.क्र./माहिती तंत्रज्ञान/२०२५-२६/०१/३९४ याप्रमाणे

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा या ऑनलाइन उपलब्ध व्हाव्यात हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने अर्जदारांना त्यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करता यावे व त्याबाबतची सद्य:स्थिती तात्काळ अवगत व्हावी याकरीता आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ३०/०४/२०१६ अन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने दि.०१/०५/२०१६ पासून संगणकीकृत ***"आदि प्रमाण प्रणाली"*** द्वारे सुरु करण्यात आलेले होते. अनुसूचित जमातीच्या दावेदारांना त्यांचे जमातीचे पडताळणीचे अर्ज संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडे e-Tribe (**https://www.etribevalidty.mahaonline.gov.in**) या पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

परंतु उपरोक्त प्रणालीमध्ये काळानुरूप बदल करणे गरजेचे असल्याने व नागरिकांना सुलभ व जलद गतीने ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र मिळणे कामी संदर्भ क्र.२ नुसार या कार्यालयामार्फत नव्याने e -Tribe Validity पोर्टल **(https://etribevalidity.trti-maha.in/)** विकसित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नव्याने विकसित केलेले e-Tribe Validity पोर्टल (आदि प्रमाण प्रणाली) **सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, महाराष्ट्र राज्याकरिता दि.१५/१०/२०२५ रोजी पासून LIVE करण्यात येत आहे.**

त्याअनुषंगाने अर्जदार यांनी त्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव संबंधित समिती कार्यालयास e -Tribe Validity पोर्टल द्वारे (https://etribevalidity.trti-maha.in/) सादर करतेवेळी काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास सदर पोर्टलच्या Support Section द्वारे किंवा मो. क्र. ९५२९९५२११४ किंवा ईमेल - **helpdesk@trti-maha.in** यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा याची नोंद घ्यावी.

(दिपा मुधोळ - मुंडे, भा.प्र.से.)
**आयुक्त**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**पुणे**

**प्रत माहिती व कार्यावाहीसाठी ,**

१ मा. सचिव,आदिवासी विकास विभाग,हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग,विस्तार इमारत, पहिला मजला, मंत्रालय,मुंबई — ४०००३२
२ सर्व सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, महाराष्ट्र राज्य